दु.क्र.०२०-२४४७६९३८
Email-curriculumdept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन् व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०

जा.क्र . राशैसंप्रपम /अविवि/ २५ % पाठ्यक्रम /२०२१ /२७८४ दि.२३.०८.२०२१.

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, (सर्व)
४) शिक्षण निरीक्षक (दक्षिण /उत्तर /पश्चिम) बृहन्मुंबई
५) शिक्षण प्रमुख /शिक्षणाधिकारी /प्रशासनाधिकारी /महानगरपालिका, नगरपालिका (सर्व).

**विषय - शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ साठी २५ % कमी करण्यात आलेल्या पाठ्यक्रमाबाबत...**

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्रमांक अभ्यास -२०२१/प्र.क्र.७९/एसडी-४, दि.२३ जुलै, २०२१.
२) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांचे पत्र क्र.ह/कार्यानुभव /२३९१, दि.१७.०८.२०२१.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये सन २०२१ - २२ या शैक्षणिक वर्षाकरिता सुद्धा सन २०२०-२१ प्रमाणे इयत्ता १ ली ते १२ वी चा २५ टक्के पाठ्यक्रम कमी करण्याचा निर्णय उपरोक्त शासन निर्णयानुसार घेण्यात आला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१- २२ या शैक्षणिक वर्षापासून इ.१० वी व १२ वी च्या काही विषयांची अंमलबजावणी सुरु आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे या कार्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२१- २२ साठी नव्याने लागू करण्यात आलेले इयत्तानिहाय पाठ्यपुस्तके पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | इयत्ता | विषयाचे नाव | लागू करण्यात आलेले वर्ष |
|---|---|---|---|
| १ | १० वी | विशेष गरजा असणा-या ( दिव्यांग ) विद्यार्थ्यांसाठी कार्यशिक्षण ( नऊविषय ) मराठी | २०२१- २२ |
| २ | १० वी | गृहशास्त्र, शरीरशास्त्र व आरोग्यशास्त्र मराठी | २०२१- २२ |
| ३ | १२ वी | कलेचा इतिहास व रसग्रहण | २०२१- २२ |
| ४ | १२ वी | भारतीय संगीताचा इतिहास व विकास | २०२१- २२ |

उपरोक्त सर्व विषयांचा २५ % पाठ्यक्रम कमी करण्यात आलेला आहे. २५% कमी करण्यात आलेल्या पाठ्यघटकांची यादी प्राप्त झाली आहे. २५% कमी करण्यात आलेल्या पाठघटकांची इयत्ता निहाय यादी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या www.maa.ac.in या वेबसाईटवर

देण्यात आलेली आहे. सदर यादी आपल्या अखत्यारीतील सर्व माध्यमिक शाळा प्रमुख, सर्व शिक्षक, सर्व विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**सोबत : २५% कमी करण्यात आलेल्या पाठ्यघटकांची यादी.**

एम. डी. सिंह ( भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

प्रत माहितीस्तव -

१) संचालक, राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ( बालभारती ), पुणे.

२) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.